# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. ३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०१/२०१८

**१) अनोळखी महिलेने सोन्याचे दागीण्यावर पैसे देतो! असे म्हणुन महिलांची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १२/०१/२०१८ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील अनोळखी स्त्री आरोपीने फिर्यादी व फिर्यादीचे घराशेजारी राहणाऱ्या महिला यांना सोन्याचे व चांदीचे दागीण्यावर पैसे व भांडे देतो! असे बोलुन त्याला विश्वासात घेवुन त्या अनोळखी आरोपी स्त्री वर विश्वास आल्याने तिला १) सोन्याचा मंगळसुत्र ज्यात ३ ग्रॅम चा पदक व १.५ ग्रॅम चे २८ मणी, दोन गहु मणी असलेला व ५० ग्रॅम चांदीच्या २ पायपट्टया २) १ मंगळसुत्र ज्यात सोन्याचे ४० मणी व २ गहु मणी वजण ३ ग्रॅम ३) १ मंगळसुत्र ज्यात सोन्याचे ३५ मणी व २ डोरले लाख असलेला २ ग्रॅम, ४) सोन्याचे कानातील २ झुमके वजन ७० ग्रॅम, ५) २ चांदीचे पायपट्टया वजन ५० ग्रॅम, असा एकुण ३३,४००/—रु. चा माल देवुन फसवणुक केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :-**

दिनांक १४/०१/२०१८ चे १९.०० ते १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सत्यवान प्रभुजी शरणागते वय ३० वर्ष, रा. सिहरी पोस्ट सालई ता. मोहाडी हा व त्याचे वडील प्रभु समाजी शरणागते वय ५५ वर्ष, रा. सिहरी हे पायी— पायी तुमसर वरुन सिहरी गावी जात असता यातील आरोपी मोटार सायकल चालाकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजी पणे चालवुन फिर्यादी व त्याचे वडील रामाजी शरणागते यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७, भादंवि. सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) इंडीका गाडीच्या धडकेत दोन जखमी . :-**

दिनांक १४/०१/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी नरेन्द्र गुलाबराव कापगते वय २१ वर्ष, रा. शेदुरवाफा ता. साकोली हा महीन्द्रा गाडी चार चाकी वाहन क्र. एमएच ३६/१७६८ चा चालक आशिष गायकवाड याचे सोबत नवेगाव बांध वरुन साणगडी कडे येत असतांना साणगडी कडुन नवेगाव कडे जाणाऱ्या यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या वाहनास शिरेगाव बांध साणगडी ते नवेगाव रोड येथे धडक देवुन फिर्यादी व आशिष यांस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०१/२०१८ चे ०६.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही नेहमी प्रमाणे कोचींग क्लासेस भंडारा येथे जाते म्हणुन घरुन निघुन गेली परत आली, नाही तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले असावे असा संशय असल्याने फिर्यादीचे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) दखलपात्र गुन्हा करण्याचे हेतुने संशयरित्या मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०१/२०१८ चे ०३.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीवर चोरीचे गुन्हे असुन आरोपीवर चोरीचे गुन्हे असुन आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे हेतुने संशयरित्या मिळुन आल्याने तसेच कोणतेही समाधान कारक उत्तर न देता उघडवाउडविचे उत्तर दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. राठोड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२(ड) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राठोड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) औषधोपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक १३/०१/२०१८ चे १६.१० वाजता. दरम्यान यातील मृतक अंकुश जनार्धन सावरबांधे वय २५ वर्ष रा. आसगाव याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा कामी सारु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी नापोशि. बिसने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास नापोशि. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**७) नायलॉन दोरीने गळफास लावुन तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक १५/०१/२०१८ चे २०.०० वाजता. दरम्यान यातील मृतक खोमेश्वर अर्जुन सेलोकर वय २३ वर्ष, रा. पांढराबोडी याने स्वत:चे घरी धाब्यावरील आळयाला नॉयलॉन दोरीने गळफास लावुन मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी मोरेश्वर अर्जुन सेलोकर वय २६ वर्ष, रा. पांढराबोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १५/०१/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने टाटा गाडी च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन पे. पंप ठाणा येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १५/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १८ लिटर हातभट्टी दारू किंमती ३६००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १५/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०५ तीन सिटर वाहनांवरती– १२ केसेस व ईतर वाहनांवरती –१०० केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.